Historicity Research Journal
Volume 1 | Issue 6 | Feb 2015 ISSN:- 2393-8900

Research Article

# मराठयांचा शेवटचा सेनापती बापू गोखले

महेशकुमार घाडगे

प्राध्यापक, इतिहास विभाग , श्रीसंत दामाजी महाविद्यालय,मंगळवेढा.

***सारांश*** **:**

छत्रपती शिवाजी महाराजांनी महाराष्ट्रात हिंदवी स्वराज्याची स्थापना करत असताना अनेक स्थानिक लोकांना सहभागी करुन त्यांच्या कर्तृत्वाच्या स्वराज्याच्या कामी उपयोग करुन घेतला हिच परंपरा छ. संभाजी, छ. राजाराम, ताराराणी, शाहू व पेशवा यांच्या काळात कायम राहिली. त्यामुळे मराठयाच्या इतिहासात अनेक कर्तृत्वान घराणी निर्माण झाली. त्यापैकी गोखले घराणे हे एक होते. दुसऱ्या बाजीरावच्या काळात बापू गोखले या व्यक्तीचा मराठयाचा सेनापती म्हणून उदय झाला असे असले तरी गोखले घराणे माधवराव पेशवे याच्या काळापासून मराठा स्वराज्यात सेवेत असल्याचे दिसते.

## *प्रस्तावना :*

### पूर्व इतिहास :-

मराठा सेनापती बापू गोखलेचे मुळ गाव कोकणात पिरंदवणे ता. विजयदुर्ग हे होते. बापू गोखलेचे आजोबा बल्लालपंत गोखले यांना दोन अपत्य धोंडोपंतव गणेशपंत गोखले याच गणेशपंत गोखले यांना दोन अपत्ये एक आप्पा गोखले व दुसरे बापू गोखले होय. सवाई माधवराव यांच्या काळात नाना फडणीस यांचे बंधु - गंगाधरपंत भानु यांच्याकडे कोकणाच्या फडणवीस काम होते. तेव्हापासून धोडोपंत, आप्पा, बापू गोखले पेशवाईत सेवा करीत असल्याचे दिसते. आपल्या हुशारीमुळे हे कुटूंब माधवराव व नाना फडणीस याची मर्जी संपादन करण्यास यशस्वी झाले. याच काळात गंगाधरपंत भानू व धोडोपंत गोखले यांच्या संघर्षामुळे हे कुटूंब पुण्यास वास्तव्यास आले. विजया दशमीच्या वेळी त्यांना सरदारकीची वस्त्रे मिळाल्याचे उल्लेख मिळतात. पालखी, नगरा, निशान काठी व शंभर घोडे ठेवण्याची परवानगी पेशव्याकडून मिळाली.

### बापू गोखल्याचा उत्कर्ष :-

बापू गोखले यांना आपला पराक्रम दाखवण्याची संधी कर्नाटक संघर्ष किलूरकर देसाईच्या विरोधात मिळाली. गणेशपंत मोटे, धोडोपंत गोखले, बापू गोखले ४००० सैन्यासह आक्रमण करुन विजय संपादन करण्यास यश मिळाले यामुळे बाजीराव याच्याकडून इनाम अलंकार स्वता:चे सैन्य अडीच ते तीन हजार वाढवण्यास परवानगी मिळाली. नवलगुदकर देसाई यांचा ३ लाख उत्पन्नाचा प्रदेश स्वता:कडे घेण्यास परवानगी मिळाल्याचे दिसते. याच काळात करवीरकर दिवाण

रत्नाकर आप्पा याच्या सावनुर शहराची ५ हजार सैन्यासह नाकेबंदी करुन विजय संपादन केला. धोंडोजी वाघ याचाही पराभव बापू गोखलेंनी केला. त्यामुळे प्रतिष्ठेत अधिकच वाढ झाली.

**पुणे दरबार व बापू गोखले :-**

पेशवा दुसरा बाजीरावने तैनाती फौजेचा स्वीकार केल्यामुळे पुणे दरबारची स्थिती अधिक गुंतागुंतीची झाल्याचे दिसते. वेलस्ली व बापू गोखले यांनी संयुक्तपणे शिंदे, होळकर, भोसले यांच्या विरोधात अनेक मोहिमा काढल्याचे उल्लेख मिळतात. बाळकृष्ण गंगाधर व मालबादाद यांचे बंड मोडून मार्च १८०३ पुण्यात बापू गोखले दाखल झाला.

**मराठा सरदार बापू गोखल्याचा स्त्रिया प्रती दृष्टीकोन :-**

कऱ्हाडचे भवानरावजी पटवर्धन - परशुराम प्रतिनिधी यांच्यात संघर्ष, परशुराम प्रतिनिधी यास दोन बायका होत्या. एक बीडकर यांची कन्या लक्ष्मीबाई तर दुसरी हैबतराव बाबा देशपांडे यांची कन्या काशीबाई. पहिली स्त्री लक्ष्मीबाई महास्वाधवी, प्रतिवता, लोक नवस करत होते यामुळे प्रतिनिधीच्या मनातून ती उतरली तेव्हा कऱ्हाड संघर्षात विजय मिळाल्यानंतर संस्थान खर्चातून तिच्या उपजिवीकेसाठी पैशाचा तजवीज व किन्हई येथे राहण्याची व्यवस्था केली.

**सेनापती पद बहाल :-**

धोंडोजी वाघ याच्यावर केलेल्या स्वारीनंतर नंतरच्या काळात वाघ व इंग्रज यांचे संबंध धिक मजबूत होण्यास सुरुवात झाली अशावेळी कर्नाटक प्रांतावर आपली स्थिती अधिक भक्कम करणे व त्याचा नशा उतरवण्यासाठी १ ऑगस्ट १८१२ बापू गोखल्यास फौजेचा मुख्य सेनापती नेमणूक सरजांम दिला. फौजेच्या खर्चासाठी पटवर्धनाकडून घेतलेला प्रदेश बापूच्या स्वाधीन करण्यात आला.

**बापू व इंग्रज :-**

मराठा सेनापती बापू गोखले याचा अनेक वेळा इंग्रजाशी संबंध आल्याचे दिसते. सुरुवातीच्या काळात हे संबंध अधिक मैत्रीपूर्ण असल्याचे दिसते. वेलस्ली व बापू अनेकवेळा एकत्रीत मोहीमेत काम केल्याचे उल्लेख मिळतात. पेशवा बाजीराव दुसरा शेवटच्या काळात एलफिन्स्टन ने बापु गोखले यांस तुम्ही आमच्या कक्षात (पक्षात) असावे असे सांगितले, तेव्हा बापु गोखले याने स्पष्टपणे यास नकार दिल्याचे दिसते. “धन्याचा इनाम बुडवल्यास इंग्रज मलाच दोष लावतील. चाकरीवर प्राण गेलातरी चिंता नाही परंतू लोकाचा अपवाद येणार नाही”, अशाप्रकारे बाजीरावाच्या शेवटच्या काळात कोणत्याही परिस्थितीत साथ न सोडण्याचा निश्चय दिसतो.

**बापू गोखले व मंगळवेढा :-**

इ.स. १८०० ते १९०० मध्ये पटवर्धन घराण्याच्या वाटण्या होवून मंगळवेढे तालुका श्रीमंत चिंतामनराव, आप्पासाहेब, सांगलीकर पटवर्धन यांचे वाटणीस गेला. इ.स. १८१८ मध्ये मंगळवेढयाहून १३ मैलावर असलेल्या आष्टीगावी शेवटचे मराठा व इंग्रज यांची लढाई होऊन मराठा साम्राज्य लयास गेले. पेशवे यांचे सेनापती बापु गोखले हे धारातिर्थी पडले. आजही मंगळवेढे गावात सेनापती बापु गोखले यांचा वाडा पडक्या स्थितीत आहे. श्री संत चोखामेळा चौकातून पूर्वेस मारवाडी गल्लीतून थोडे पुढे गेलो की, आपणास उजव्या हातास तो वाडा पडक्या अवस्थेत दिसतो.

**बापू गोखले व आष्टीची लढाई :-**

पेंढाऱ्याच्या विरोधात साहय करण्याची हमी देऊन बाजीरावाने माल्कनकडून सैन्य भरतीची परवानगी मिळवली. सैन्य भरती करुन सैन्य बापूच्या मार्गदर्शनाखाली नेमल्याचा उल्लेख मिळतो. तुमचे शिवाय मी कोणाची मसलत ऐकणार नाही असे स्वहस्ताक्षरातील पत्र देवूनही खडकी च्या लढाईत बापू गोखलेचा सल्ला बाजीरावाने मानला नाही.

पेशवा बाजीरावाने पुणे सोडल्यानंतर बाजरावाचे रक्षण करीत सैन्य एका ठिकाणापासून दुसऱ्या ठिकाणी जात होते. इंग्रजाच्या विरोधात नेमकी कोठे लढाई दयावी याबाबत मराठा सरदारामध्ये एकमत दिसत नव्हते. निपाणीजवळ सैन्य एकाच वेळी जमा न होणे, सोलापूर येथे लढा देण्याची तयारी पूर्ण परंतू पेशव्याचा मुक्काम हालल्यामुळे तेथेही लढाई शक्य झाली नाही. आष्टी (ता. मोहोळ) येथे पेशवे बाजीराव दुसरा, बापू गोखले, यमुनाबाई, सातराचे राजे, दिवाण विठ्ठलपंत हजर होते. यावेळी लियोनियल स्मीथ इंग्रज अधिकाऱ्याबरोबर - बापू गोखले याने लढा देण्याचे ठरले. बाळाजी तात्या व रामचंद्र व्यंकटेश सुभेदार यांनी इंग्रजाबददल पेशव्यास माहिती द्यावी.बापू गोखले यांनी आष्टीच्या लढाईत मोठा पराक्रम केला परंतू त्याचा मृत्यु झाला तेव्हा आष्टीच्या पाटलास बोलावून प्रेत त्यांच्या हवाली केले. येवतीच्या कुलकर्णीने प्रेतास अग्नी दिला. यावेळी गोखल्याचे फडणवीस, हरिभाऊ देशमुख हजर होते.

बापु गोखले याच्या जहागीरी संदर्भात बाजीराव दुसरा व मालकम याची भेट असरीगड येथे झाली, पुणे दरबार व एलफिस्टन याच्या झालेला पत्रव्यवहार यमुनाबाईने वारस घेतल्यास जहागीरीची तजवीज करता येईल असा उल्लेख मिळतो. परंतू यमुनाबाईने वारस नाकारला. बापू गोखले एकदंरीत कारकीर्द अनेक पराक्रमाने भरलेली दिसते. कितुरकरचे देसाईचे बंड, सचिवाचे बंड, कऱ्हाडचे भवानराव प्रतिनिधी व परशुराम प्रतिनिधी यांच्याशी संघर्ष, धोंडोजी वाघ याच्यावर स्वारी करवीरकर दिवाण रत्नाकर आप्पा याच्यावर विजय हे पराक्रमाची साक्ष देते.

बापु गोखले यास राजकारणाची मसलत नव्हती अशी टिप्पणी काही इतिहासकार करतात. होळकर व शिंदे इंग्रजाच्या विरोधात थकले. भोसले रुसलेले व गायकवाड इंग्रजांना मिळाले असताना इंग्रजाशी लढा दयावा कि नाही याबाबत विचार करणे गरजेचे होते. अशा या शेवटचा मराठा सेनापतीचे वास्तव काही काळाकरीता मंगळवेढयामध्ये असल्याचा उल्लेख मिळतो.

**संदर्भ ग्रंथ :-**


१) *शंकर तुकाराम शाळीग्राम, बापू गोखले चरित्र,१८८२ द्वितीय अवृत्ती.*

२) *शिवराम महादेव परांजपे, मराठयाच्या लढाय्यांचा इतिहास, १८०२-१८१८, द्वितीय आवृत्ती, पुणे, १९२८.*

३) *गो.ग. सरदेसाई, मराठी रियासत, खंड - ८, १९९२ - ९३.*

४) *ग. चि. वाड, पेशवे बाजीराव दुसरा रोजनिशी*

५) *वि.ग. खोबरेकर, महाराष्ट्राचा इतिहास - मराठा कालखंड भाग २, १७०७-१८१८ प्रथम आवृत्ती - १९८८.*




**सेनापती बापू गोखले यांचे संग्रहीत छायाचित्र**



**महेशकुमार घाडगे**
**प्राध्यापक, इतिहास विभाग , श्रीसंत दामाजी महाविद्यालय,मंगळवेढा.**